<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१९</u> <u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>

सरकार विरूध्द सुरेश

मी शपथपूर्वक खरे सांगतो की निशाणी – १२१

माझे नाव – प्रमोद तुळसीराम कांबळे
वय – अंदाजे ५२ वर्ष, व्यवसाय – केबल व्यवसाय
राहणार – कामगार नगर, कामठी.

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जगताप यांच्या कडून**

मी सन २०१३–१४ साली कामठी प्रभाग क्र. ७ मधून नगर सेवक म्हणून निवडून आलो होतो. प्रभाग क्र. ७ च्या सुधारणेकरीता शासणाकडून काही रक्कम आली होती. सुधारणा म्हणजे रस्ते, नाली, ई. चे बांधकाम करणे होते. सदरचे बांधकाम करण्याकरीता नगर परिषद टेंडर काढते. त्या साली दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत १३ करोड रूपयाचा निधी नगर परिषदेकडे आला होता. सन २०१३–१४ साली दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत काही टेंडर निघाले होते. सन २०१३–१४ साली कनिष्ठ अभियंता कोण होते हे मला माहिती नाही. मी आरोपींना ओळखतो, त्या पैकी आरोपी क्र.१ हे कनिष्ठ अभियंता हे होते. २०१३–१४ साली प्रभाग क्र. ७ मध्ये रस्ते व नाली बांधकाम करण्याचे टेंडर निघाले होते. रस्ता हॉकी बिल्डींग ते आसाराम कांबळे यांच्या घरापर्यंत बांधायचा होता. नाली नामानंद गजभिये यांच्या घरापासून देशभ्रतार यांच्या घरानंतर रंजित करडे यांच्या घरापर्यंत नाली बांधयची होती. सदर बांधकामाचे टेंडर साई कंन्स्ट्रक्शन यांच्या नावे पास झाले होते. हॉकी बिल्डींग ते आसाराम कांबळे येथे बांधलेल्या एकाच रस्त्याचे दोन टेंडर काढले. त्याचे बिलींग काढण्यात आले. त्याचे अंदाजे १४ लाख व काही रक्कम तसेच दुसरी रक्कम ६,५०,०००/– ईतक्या रकमेचे बिल काढले. ही दोनही बिले रस्त्याच्या बांधकामाची होती. एकाच रस्त्याचे दोनदा बिल काढल्याने नगर पालिकेमध्ये प्रस्ताव देण्यात आला. तो प्रस्ताव भ्रष्टाचार केल्याबाबतचा होता. जे दोषी अधिकारी होती त्यांची चौकशी सुरू केली. त्या चौकशी मध्ये दोशी अधिका–यांवर कारवाई झाली व एकाच रस्त्याचे दोन बिल काढल्याचे निष्पन्न झाले. ते अधिकारी व कर्मचारी कोण होते मला माहिती नाही. त्या वर्षी एफ.आय.आर. दाखल झाला. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. आज आरोपी सुरेश बोरकर न्यायालयात हजर नाही. उर्वरीत कोण आरोपी हजर आहे का याची मला माहिती नाही. (आरोपी सुरेश बोरकर यांचा गैरहजेरीचा अर्ज निशाणी १२० कडे दाखल आहे. तो ओळखत आव्हानित न करण्याच्या मुद्दयावर मंजूर करण्यता आला आहे.)

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरू**

हे म्हणणे खरे आहे की टेंडरची वर्तमानपत्रात मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्या सहीने प्रसिध्दी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की त्या जाहिरातीप्रमाणे लोक टेंडर भरतात. हे म्हणणे खरे आहे की टेंडर निघण्यापूर्वी त्याचे एस्टीमेट तयार केले जाते. टेंडर पास करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी व नगराध्यक्षांची असते का हे मला माहिती नाही. टेंडर कधी निघाली होती

याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे  आहे की एस्टीमेट कोणी दिले होते याची मला माहिती नाही.

**उलटतपास संपला.**

**आरोपी क्र.१ व ४ तर्फे वकील श्रीमती तागडे व आरोपी क्र. २ व ५ तर्फे वकील श्री. भिमटे यांनी आरोपी क्र.३ तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकारला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.24 15:41:26 +0530

कामठी
दिनांक  २४/०४/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी